**अनुसूचित जमातीच्या उमेदवारांच्या जाती प्रमाणपत्राची / दाव्यांची तपासणी. तपासणी समितीच्या कामाचे स्वरुप व अधिकाराबाबत.**

## महाराष्ट्र शासन

आदिवासी विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक एसटीसी-१३९९/प्र.क्र.२/का.१०
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ९ सप्टेंबर, १९९९.

<u>वाचा</u>:-(१) शासन परिपत्रक, समाजकल्याण सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, क्रमांक : सीबीसी-१६८०/१९९६१/ का.५, दिनांक ६ मे, १९८० व शुध्दीपत्रक दिनांक : ३ जून, १९८०.

(२) शासन निर्णय, समाजकल्याण सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, क्रमांक : सीबीसी-१६८०/ ४३६६९/ का.५, दिनांक : २९ ऑक्टोबर, १९८०.

(३) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक : सीबीसी -१६८४/२८१८/(२९१) / का.११, दिनांक : २३ जानेवारी, १९८५.

(४) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक : सीबीसी-१६८४/ (३९२) / का.११, दिनांक : ८ मार्च, १९८५.

(५) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक : सीबीसी- १६८५/(५१३)/का.१०, दिनांक : १३ऑगस्ट, १९८५.

(६) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक : सीबीसी- १६८५/(५१३)/का.१०, दिनांक : १८एप्रिल, १९८६.

(७) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक :एसटीसी-१०९०/२३९४२/१८६/का.१०, दिनांक: ३ जून, १९९२.

(८) सह सचिव, कल्याण मंत्रालय, केंद्र शासन, नवी दिल्ली यांचे अर्ध शासकीय पत्र क्रमांक : १२०१८ / १३/९५-एससीडी / आर-सेल, दिनांक : २५ सप्टेंबर, १९९५.

(९) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक: एसटीसी-१०९५/ प्र.क्र.११८ / का.१०, दिनांक : २६ ऑक्टोबर, १९९५.

(१०) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक : एसटीसी-१६९६/प्र.क्र.३४/ का.१०, दिनांक : ७मार्च, १९९६.

(११) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक : एसटीसी-१८९५/प्र.क्र.१८२/भाग-२/का.१०, दिनांक : १५ मार्च, १९९६.

(१२) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक : एसटीसी -१८९५ / प्र.क्र. १८२ / का. १०, दिनांक : १४ जुलै, १९९७ व शुध्दीपत्रक दिनांक : २३ जुलै, १९९७.

जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी
- 4 OCT 1999
शाखा प्र. लि. नि. उ. जि. जिल्हाधिकारी

(१३) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक : एसटीसी-१०९८/ प्र.क्र.३३/का.१०, दिनांक : ११ जून, १९९८.

(१४) शासन शुध्दीपत्रक, आदिवासी विकास विभाग, क्रमांक : एसटीसी- १०९९/ प्र.क्र.३३ / का.१०, दिनांक : १६ एप्रिल, १९९९.

(१५) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक : एसटीसी-१०९८/प्र.क्र.३३/का.१०, दिनांक : १९ एप्रिल,१९९९.

**शासन निर्णय** :- अनुसूचित जमातीच्या उमेद्वारांच्या जातीच्या प्रमाणपत्राची तपासणी करण्याकरिता पुणे, नाशिक व नागपूर येथे ३ समित्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत. या समित्यांचे कामाचे स्वरुप व अधिकार, जाती प्रमाणपत्र तपासणी समितीची रचना, दक्षता पथकाची रचना, जे अनुसूचित जमातीचे विद्यार्थी वैद्यकीय व अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रथम वर्षाला प्रवेश घेऊ इच्छितात त्यांच्या जाती प्रमाणपत्राची पडताळणीबाबतची कार्यपध्दती व स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये अनुसूचित जमातीकरिता राखीव असलेल्या प्रभागातून निवडून येणाऱ्या उमेदवारांचे जातीचे दाखले तपासणे, इत्यादी बाबतचे आदेश संदर्भाकित शासन आदेशान्वये दिलेले आहेत. या सर्व तरतुदी एकत्रितकरणाचा व सुलभिकरण करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. वरील सर्व आदेश अधिक्रमित करुन एकत्रित आदेश निर्गमित करण्यात येत आहे. सर्व संबंधितांनी जाती प्रमाणपत्र पडताळणी करताना खालील आदेशांचे अनुपालन करावे.

**अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांची रचना**

२.१ राज्यातील विविध महसूल विभागांकरिता असलेल्या जाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांची रचना पुढील प्रमाणे आहे.

(अ) अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समिती, पुणे
(कार्यक्षेत्र:पुणे व मुंबई महसूल विभाग)

| | |
|---|---|
| (१) संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे | अध्यक्ष |
| (२) अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे. | सदस्य |
| (३) उप संचालक (संशोधन) | सदस्य सचिव |
| (४) संशोधन अधिकारी | सदस्य |
| (५) संशोधन अधिकारी | सदस्य |

(ब) अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नाशिक
(कार्यक्षेत्र : नाशिक व औरंगाबाद महसूल विभाग)

| | |
|---|---|
| (१) संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे | अध्यक्ष |
| (२) (अ) अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक | सदस्य (नाशिक विभाग) |
| (ब) अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती | सदस्य (औरंगाबाद विभाग) |
| (३) उपसंचालक (संशोधन) | सदस्य सचिव |
| (४) संशोधन अधिकारी | सदस्य |
| (५) संशोधन अधिकारी | सदस्य |

(क) अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नागपूर
(कार्यक्षेत्र:अमरावती व नागपूर महसूल विभाग)

| | |
|---|---|
| (१) संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे | अध्यक्ष |
| (२) (अ) अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर | सदस्य (नागपूर विभाग) |
| (ब) अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती. | सदस्य (अमरावती विभाग) |
| (३) उपसंचालक (संशोधन) | सदस्य सचिव |
| (४) संशोधन अधिकारी. | सदस्य |
| (५) संशोधन अधिकारी. | सदस्य |

२.२ अनुसूचित जमातीच्या जातीच्या दाव्याच्या संदर्भात निर्णय घेण्यासाठी प्रत्येक सुनावणीच्या मुलाखतीच्यावेळी तीन सदस्यांची गणपूर्ती आवश्यक राहील. या तीन सदस्यांपैकी कमीत कमी एक सदस्य अध्यक्ष किंवा अपर आयुक्त असेल.

**जातीचे प्रमाणपत्र / जातीचा दावा तपासणीकरिता समितीकडे सादर करावयाची कागदपत्रे**

३.१ जातीचे प्रमाणपत्र / जातीचा दावा तपासण्याकरिता संबंधितांनी खालीलप्रमाणे कागदोपत्री पुरावे समितीकडे पाठविणे आवश्यक आहे:-

(अ) संबंधित व्यक्ती ज्या ठिकाणची मूळ रहिवासी असेल त्याच ठिकाणच्या सक्षम अधिका-याने, शासनाने निर्धारीत केलेल्या नमुन्यात दिलेले जातीचे मूळ प्रमाणपत्र.

(ब) संबंधित व्यक्तीचे प्राथमिक व माध्यमिक शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र.

(क) संबंधित व्यक्तीने ज्या शाळेत / महाविद्यालयात शिक्षणक्रमाचे अंतिम वर्ष पूर्ण केले असेल/ करीत असेल ती शाळा / महाविद्यालय सोडल्याचे प्रमाणपत्र किंवा त्या शाळा / महाविद्यालयाच्या दप्तरात असलेल्या जातीच्या नोंदीसंबंधीचे प्रमाणपत्र.

(ड) संबंधित व्यक्ती शासकीय सेवेत असेल तर त्याच्या सेवापुस्तकातील जाती विषयक नोंद असलेल्या पृष्ठाचा उतारा.

(इ) संबंधित व्यक्तीच्या वडीलांच्या प्राथमिक / माध्यमिक शाळा सोडल्याचा दाखला किंवा जन्म-मृत्यू नोंदवहीतील उतारा.

(फ) संबंधित व्यक्तीच्या जवळच्या नात्यातील म्हणजे वडील/ वडील भाऊ/ चुलते/ चुलत भाऊ/ चुलत बहीण किंवा रक्ताचे नातेसंबंध असलेल्या वडीलधारी नातेवाईकांचे जातीचे प्रमाणपत्र किंवा त्यांच्या जन्म नोंदणी रजिस्टरमधील उतारा.

(ग) संबंधित व्यक्तीच्या वर नमूद केलेल्या रक्ताचे नातेसंबंध असलेल्या नातेवाईकांपैकी शासन सेवेत असलेल्या नातेवाईकांच्या सेवा पुस्तकातील जातीची नोंद असलेल्या पृष्ठाचा प्रमाणित उतारा.

३.२ विशिष्ट प्रकरणात वरीलप्रमणे नमूद केलेले पूराव्यांव्यतिरक्त अतिरिक्त कागदोपत्री पुरावे आवश्यक आहेत अशी खात्री जाती प्रमाणपत्र तपासणी समितीची झाल्यास ती कागदपत्रे मागण्याची मुभा त्यांना राहील.

**अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांच्या कामाचे स्वरुप**

४.१ अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समितीला खालीलप्रमाणे जातीच्या दाखल्यांची तपासणी करण्याचे अधिकार आहेत. तपासणीमधे जातीचे प्रमाणपत्र अवैध आढळल्यास ते रद्द करण्याचे व जप्त करण्याचे अधिकार समितीस रहातील. या बाबतीत तपासणी समितीचा निर्णय अंतिम राहील.

(अ) वैद्यकीय व अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेश घेणा-या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांच्या जातीच्या प्रमाणपत्रांची / जातीच्या दाव्यांची तपासणी करणे.

(ब) अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेल्या पदांवर महाराष्ट्र लोकसेवा आयोग / विविध निवडमंडळे, प्रादेशिक दुय्यम सेवा निवड मंडळे व निवड समित्या यांच्यामार्फत शासन सेवेत नियुक्तीसाठी शिफारस करण्यात आलेल्या अनुसूचित जमातीच्या उमेदवारांच्या जातीच्या प्रमाणपत्रांची/ जातीच्या दाव्यांची तपासणी करणे.

(क) शासन सेवेत असलेल्या कर्मचा-यांच्या जाती दाव्याच्या संदर्भात संबंधित विभाग / कार्यालये यांच्याकडून प्राप्त झालेल्या जाती दाव्यांच्या प्रकरणांची तपासणी करणे.

(ड) शासन, आदिवासी विकास विभागामार्फत सोपविलेल्या जातीच्या प्रमाणपत्रांच्या / दाव्याच्या प्रकरणांची तपासणी करणे.

(इ) मा.उच्च न्यायालयाकडून अनुसूचित जमातीच्या जातीच्या प्रमाणपत्रांची / दाव्यांची तपासणी करण्याबाबत सोपविलेली सर्व प्रकरणे.

(फ) महाराष्ट्र राज्याचे कायम रहिवासी असलेल्या ज्या व्यक्तींची केंद्रशासनाच्या सेवेत व केंद्रशासनाच्या अंगीकृत उपक्रमात राखीव जागेवर नेमणूक करण्यात आली आहे अशा अनुसूचित जमातीच्या व्यक्तींच्या जातीच्या प्रमाणपत्रांची / दाव्यांची तपासणी करणे.

(ग) जिल्हा परिषदा, नगरपालिका, महानगरपालिका, निमशासकीय कार्यालये, बँका, शासकीय व निमशासकीय उपक्रम ( उदा. एस.टी.महामंडळ, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ ) व राज्य शासन अंगीकृत इतर संस्था इत्यादी मध्ये अनुसूचित जमातीसाठी राखीव जागांवर नेमणुकीसाठी शिफारस केलेल्या सर्व कर्मचा-यांची / अधिका-यांची प्राप्त झालेली जातीची प्रमाणपत्रे / दावे तपासणे.

(ह) अनुसूचित जमातीच्या नसलेल्या व्यक्तीला जर सक्षम अधिकाऱ्यांनी अनुसूचित जमातीचे जातीचे प्रमाणपत्र दिले आहे अशा प्रकारच्या तक्रारीची तपासणी करणे.

(ज) जातीचा दाखला द्यावयास नाकारुन सक्षम प्राधिकाऱ्यांनी दिलेल्या निर्णयाविरुध्द १५ दिवसाचे आत संबंधित अर्जदाराने समितीपुढे अपिल केल्यावर त्यावर निर्णय देणे. (यासाठी संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांनी अर्जदारास अर्ज का नाकारण्यात आला आहे त्याबाबतची कारणे कळवावीत तसेच संबंधित समितीकडे १५ दिवसाच्या आत अपिल अर्ज सादर करु शकतात असे कळवावे.)

(ल) स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अनुसूचित जमातीकरिता राखीव असलेल्या प्रभागातून निवडणूक लढवून निवडून आलेल्या उमेदवारांच्या अनुसूचित जमातीच्या जातीच्या प्रमाणपत्राची पडताळणी करिता संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांनी संबंधित अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी

समितीकडे १५ दिवसाच्या आत आवश्यक त्या कागदपत्रासह पाठविल्यानंतर संबंधित अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समितीने अशा उमेदवारांच्या जाती दाव्याची पडताळणी ४५ दिवसाच्या आत करुन घेतलेला निर्णय संबंधित जिल्हाधिका-यांकडे पाठविणे.

४.२ अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्रांची / जातीच्या दाव्याची तपासणी प्रक्रिया मा. सर्वोच्च न्यायालयाने कु.माधुरी पाटील विरुध्द अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे व इतर या प्रकरणी (विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक १४७६७/९३ मधील सिव्हील अर्ज क्रमांक ५८५४/९४) दिलेल्या मार्गदर्शक सूचनेतील तरतुदीनुसार संबंधित अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समितीने कार्यवाही करावी.

**वैद्यकीय व अभियांत्रिकी अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊ इच्छिणा-या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना वेळेवर वैधता प्रमाणपत्र देण्याकरीता अवलंबावयाची कार्यपध्दती**

५.१ अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी वैद्यकीय व अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाकरिता राखीव जागा असतात. त्या जागांकरिता अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांनी प्रवेशाकरिता प्रवेश अर्ज सादर करताना जातीचा दाखला जोडावा. मात्र प्रवेशाच्या वेळी अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समितीकडील वैधता प्रमाणपत्र सादर करावे. त्यानंतरच राखीव जागेवर प्रवेश दिला जाईल. याकरिता खालील कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा.

(अ) अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांनी विहित नमुन्यातील अर्ज व त्यामध्ये निर्देश केलेली कागदपत्रे खालीदर्शविलेल्या समित्यांकडे पाठविण्यासाठी संबंधित शैक्षणिक संस्थेकडे १५ नोव्हेंबर पर्यंत सादर करावीत.

| समिती | जिल्हा | विभाग |
|---|---|---|
| (१) अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समिती, २८, क्वीन्स गार्डन, पुणे-४११ ००१. | पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर | पुणे विभाग |
| | मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | कोकण विभाग |
| (२) अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समिती, आदिवासी विकास भवन, रमाबाई आंबेडकर कन्या शाळेजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक-४२२ ०२२. | नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगांव, अहमदनगर, | नाशिक विभाग |
| | औरंगाबाद, जालना, परभणी, बीड, नांदेड, उस्मानाबाद, लातूर, हिंगोली | औरंगाबाद विभाग |

| | | |
|---|---|---|
| (३) अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समिती,<br>आदिवासी विकास भवन,<br>गिरीपेठ, अमरावती रोड,<br>नागपूर-४४० ०१०. | बुलढाणा,अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ.<br><br>वर्धा, नागपूर, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया. | अमरावती विभाग<br><br>नागपूर विभाग |

(ब) सर्व शैक्षणिक संस्थांनी विद्यार्थ्यांचे विहित नमुन्यातील अर्ज संबंधित अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समितीकडे ३० नोव्हेंबर पर्यंत पोहोचतील या बेताने पाठविण्याची व्यवस्था करावी.

(क) जे अर्ज विहित मुदतीत अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समितीकडे सादर होणार नाहीत ते अर्ज कोणत्याही परिस्थितीत विचारात घेतले जावू नयेत.

(ड) संबंधित अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समितीने त्यांच्याकडे दि. ३० नोव्हेंबर पर्यंत प्राप्त झालेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांच्या अर्जाची तपासणी करुन त्या प्रमाणपत्राच्या वैध / अवैधतेबाबत आपला निर्णय सर्व विद्यार्थ्यांना पुढच्या ३१ मे पूर्वी कळविण्यात यावा.

५.२ उच्च व तंत्रशिक्षण विभाग व शालेय शिक्षण विभाग यांनी तसेच त्यांच्या अधिनस्त असलेल्या संबंधित अधिका-यांनी या शासन निर्णयाच्या प्रती विज्ञान शाखेच्या ११ वी व १२ वी इयत्तेचे वर्ग चालवित असलेल्या सर्व विश्वविद्यालयांना, महाविद्यालयांना, कनिष्ठ महाविद्यालयांना व शाळांना पाठवाव्यात आणि या बाबीला प्रत्येक वर्षी शैक्षणिक सत्राच्या सुरुवातीस मोठ्या प्रमाणात प्रसिध्दी द्यावी. ही प्रसिध्दी शाळा / महाविद्यालयाच्या सूचना फलकावर योग्य प्रकारची सूचना लावून प्रसिध्दी द्यावी. तसेच वर्गामध्ये स्वतंत्र बैठका घेऊन अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना या सुधारीत पध्दतीची माहिती द्यावी. तसेच या शासन निर्णयातील सूचना अनुसूचित जमातीच्या सर्व विद्यार्थ्यांच्या व विद्यार्थिनींच्या वैयक्तिक नजरेस लेखी आणाव्यात व त्याची पोच रेकॉर्डवर ठेवावी.

**अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समितीकडून ३ महिन्यात पडताळणी समितीचा निर्णय प्राप्त न झाल्यास नियुक्ती देण्याबाबत**

६.१ महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत तसेच विविध निवड मंडळांमार्फत अनुसूचित जमातीकरीता राखीव असलेल्या पदावर शिफारस झाल्यानंतर त्याची नियुक्ती करण्यापूर्वी संबंधित विभागांनी / कार्यालयांनी जाती प्रमाणपत्र पडताळणीबाबतची सर्व कागदपत्रे अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समितीकडे पाठवावी. अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समितीने जादा कागदपत्रांची मागणी केल्यानंतर उमेदवारांनी त्याची पूर्तता केल्यानंतर ३ महिन्यात तपासणी समितीने निर्णय द्यावा. तपासणी समितीचा निर्णय या मुदतीत प्राप्त झाला नाही तर संबंधित विभागाने उमेदवारास तपासणी

समितीच्या निर्णयाच्या अटीच्या अधिन राहून नेमणूक द्यावी. अशा प्रकरणात विलंब टाळण्याकरिता सर्व विभागांनी / कार्यालयांनी आवश्यक ती सर्व कागदपत्रे वेळेत पाठविण्याची दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सनुगावीत

( स.नु.गावीत )
शासनाचे अवर सचिव.

प्रति,
राज्यपाल यांचे सचिव.
मुख्यमंत्री यांचे सचिव.
उपमुख्यमंत्री यांचे सचिव.
मंत्री / राज्यमंत्री, (आदिवासी विकास) यांचे खाजगी सचिव.
सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
सर्व विभागीय आयुक्त.
• सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग.
• प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई.
• प्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई.
• प्रबंधक, उच्च न्यायालय (अपिल शाखा), मुंबई.
• प्रबंधक, उच्च न्यायालय ( मूळ शाखा), मुंबई
• प्रबंधक, मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ, औरंगाबाद/नागपूर.
• सचिव, गृह मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली.
सामान्य प्रशासन विभाग (१६-ब), मंत्रालय, मुंबई.
सर्व मंत्रालयीन विभाग.

त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांना याबाबतच्या सूचना द्याव्यात.

आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, २८,क्वीन्स गार्डन, पुणे.
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे ( १० प्रती)
संचालक, नगरपालिका प्रशासन, मुंबई.
शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
उच्च शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.